CNR No. MHRG1200003332016

नियमीत दिवाणी दावा क्र. २६/२०१६
महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ तर्फे
दिनेश कांबळे वि. मनोज मोरे

## निशाणी क्र.४५ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ नुसार दाव्याच्या सरनाम्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ यांनी प्रस्तूतचे अतिक्रमण हटवून मिळण्यासाठी दावा दाखल केला असून सदर महामंडळाचे वरीष्ठ व्यवस्थापक दिनेश आवबा कांबळे यांनी बदली झालेली असून तद्‌नंतर वरीष्ठ व्यवस्थापक संजय ढेकणे यांची सुध्दा बदली झाली आहे. सदर महामंडळामध्ये वरीष्ठ व्यवस्थापक म्हणून क्षिप्रा हाके-बोरा या कार्यरत आहेत. सबब सदर दाव्याचे कामकाज चालविण्यासाठी दाव्याच्या सरनाम्यात वादीचे नाव बदलणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे वादीने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन या अगोदर सुध्दा वादीने प्राधिकृत अधिकारी यांच्या नावामध्ये बदल करण्यासाठी अर्ज दिला होता. परंतू, त्याप्रमाणे दुरुस्ती केली नाही. त्यामुळे न्यायालयाने सदर आदेश रद्द केला आहे. प्रस्तूतचा अर्ज त्यानंतर दोन वर्षाने दाखल करण्यात आला आहे. अर्ज विलंबाने दाखल करण्यात आल्यामुळे फेटाळण्यात यावा अशी त्यांनी मागणी केली आहे.

२. वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस. पी. सानप आणि प्रतिवादी विद्वान वकील श्रीमती एम. एस. बाने यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तूतचा दावा खारीज आदेशासाठी प्रलंबित असून वादीने निशाणी क्र. २३ कडील दुरुस्ती आदेशाची पुर्तता केली नाही. परंतू, प्रस्तावित दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच सदर दुरुस्ती केल्याशिवाय सदर दावा वादीला पुढे चालविता येणार नाही या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रामध्ये प्रस्तावित दुरुस्ती करुन दुरुस्ती वाद पत्र सादर करावे.

३. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE
Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2022.12.03 17:31:45 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०३/१२/२०२२

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड